ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## SPECIAL ISSUE : V
## FEBRUARY - 2021

ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

# 'लोकसाहित्य परंपरा एक अभ्यास'

प्रा.डॉ.निवृत्ती विनायक मिसा
वाणिज्य विज्ञान महाविद्यालय सोनाई, ता.नेवासा जि.अहमदना

भारतीय परंपरा आणि संस्कृती या दृष्टीने लोकसाहित्याच अमौलिक आहे साहित्यात भारता आदिसंतनाचे अस्सल वाड्मय भंडार आहे . हे आदि संताण म्हणजे आदिवासी भिल्ल ,कोरकू, बनजार माडिया,गोंड , नागा, कोलम, धनगर , वारली , इ. जंगलात राहणारे दर्याखोऱ्यातून हिण्ड्णाऱ्या वन्य जमाती तसेच महार, मांग, चांभार, वैदू, कैकाडी, इ. मागास समजल्या जाणारे आणि मराठा कुणबी इ लोक हेच लोकसाहित्याचे खरे वारसदार होय. शहरीभागतील लोकांपेक्षा ग्रामीण भागातील लोकांनी ह वारसा जोपासला त्यात भर टाकली आणि तो विकसित केला. व दुसऱ्या पिढीस घेण्यासाठी हा ठेव जतन केला आहे.

लोकसाहिव त्याचा अभ्यासाचा प्रारंभ १७ व्या शतकात झालेला आढळतो . लोकसाहित्यात आढळणारे अनेक रचना बंध आणि जीवनचित्र यांच्या अभ्यासामुळे आपले संस्कृतिक जीवन आकलन वाढते.व साहित्यिक जाणिवही वृद्धीगत होते. तसेच आपले वाङ:मयभिरुचे ही विकशीत होते. म्हणून लोकसाहित्याचा अभ्यास महत्वाचा ठरतो.

१८९२ साली जर्मन मध्ये जेकब ग्रीम आणि विल्यम ग्रीम यांनी मौखिक परंपरेने चालत आलेल्या काठाचे संकलन करून त्याला विस्तृत प्रस्तावना लिहिली आणि लोकसाहित्याच्या शास्त्रीय अभ्यासाला १९०० व्या शतकापासून सुरुवात केली.

मानवजात वर्षानुवर्षे पारंपारिक जीवनपद्धतीला प्रमाण मानात आले. याचे कारण लोकसहित्याचा लोक जीवनावरील प्रभाव होय. २१ व्या शतकाच्या प्रारंभी विज्ञानाने झेप घेतली आहे. प्रतिदिनी नीत्य नवे शोध लागत आहे सृष्टीतील अगम्य गोष्टीचे गुण प्रकाशात येत आहे. त्यामुळे लोकजीवनात रूढ असलेल्या कितीतरी समजुतींना, अंध विश्वासांना हदरे बसत आहे. परंतु रूढी मुळातुन नष्ट होतांना दिसत नाही. उलट काही ठिकाणी परंपरा नवता या दोन मुद्दयाच्या सनातन संघर्षात लोक जीवनातले जुनेच संदर्भ पुन : नव्या चेहऱ्याने जन्म घेताना आढळतात. याचा अर्थ माणसावर लोकसाहित्याची म्हणजेच पारंपारिक जीवन पद्धतीची, जीवनशैलीची पकड घटत आहे. म्हणून नव्या दिशा शोधताना तो पुरानसंदर्भ देतो. पारंपारीक जगणेच मानवाच्या जीवनाशी खिळून राहिले परिणामी लोकसाहित्य लोकजीवनावर आपला प्रभाव टिकून राहिला.

लोकसाहित्य हे लोकांचे पर्यायाने त्या देशाचे मानधन आहे. अमुल्य खजिना आहे. लोकसाहित्यात लोकजीवनाचे संस्कृती विविध रुपे ,चित्र रेखाटलेली अखे. लोकसाहित्यात लोकांचा आत्मा समवलेला असल्याने लोकसाहित्य जीवन ठरते. लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचा

...संबंध असतो. लोकजीवनातून लोकसाहित्य साकार होत असल्याने लोकसाहित्यात परिवर्तन ...परीहार्य ठरते.

अनेक लोकांनी लोकसाहित्याची संकलन केले आहे. डॉ सरोजनी बाबर यांनी महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीच्या माध्यमातून एक होता राजा , दसरा, दिवाळी, साजशिंगर असे अनेक पुस्तके संकलनाच्या माध्यमातून दिली आहेत. तीच पुस्तके संहिता म्हणुन लोक वापरत आहेत. समजातील ...िखिक परंपरेतून निर्माण झालेले वाड्मय मिळविणे एवढे सोपे नाही. हे सर्व आज लिखित स्वरुपात ...ले. या विषयातून अनेक नवनवीन विषय सुचतात त्यातून लोकसाहित्य संशोधांनासाठी नवीन दिशा मिळताना दिसतात . विशिष्ट समाजाचे कथा, गाणे, गीते, असोत परंतु ते गीत ते कथा सर्व समाजासाठी असते तो व्यक्ति किंव्हा समुह एका जातीचा असतो. परंतू एका विशिष्ट समाजाचे नसते. ...तून फक्त समाज केंद्र स्थानी असतो. तो गीत कथा म्हणत असतो. उदा . धनगर समाज कथा गिते ... करत असताना सर्व धर्मीय लोकांसाठी लोकांचे कल्याण होण्यासाठी ही कथा गिते म्हंटली जाते. रामायण महाभारत, यातील कथाही म्हंटली जाते.

सुंबरान मांडिलं गा सुंबरान मांडिलं

तवाच्या या, येळला, तवाच्या ग येळला"

सुंबरान म्हणजे स्मरण गित किंव्हा प्रार्थना वरील पदाने धनगरी गिताची सुरवात होते. ही गिते ओवी छंदात असतात. या गितास धनगरी ओव्या किंव्हा वानाच्या ओव्या संबोधल्या जातात बिरोबा म्हणजे विर पराक्रमाचा देव महान शक्तीचे प्रतीक या पराक्रमी देवाचे स्मरण धनगरी ओव्यातून केले जाते.

वरील ओवी मधून असे लक्षात येते की, देवाची प्रार्थना सर्व समजातील घटकासाठी केली जाते. ...एका जातीसाठी केली जात नाही. या मध्ये सुंबरान मांडिलं' याचा अर्थ संशोधनामुळे आपणास ...मदत झाली.

क्षेत्रीय अभ्यास करतांना विशिष्ट समाजामध्ये कथा गिते म्हंटले जात असतांना काही बाबींचा ... त्याचा अर्थही कळतो अनेक जातींच्या पोटजाती समाजाला संशोधनाद्वारे समजले जाते व ... संकलन करून लिखित स्वरुपात साहित्यात येते.व असे साहित्य पुढच्या पिढीला उपयोगी होते ...त्रीय अभ्यासातून लोकसाहित्य अभ्यासात नवनव्या दिशा मिळतात.

संदर्भ

१. डॉ विश्वनाथ शिंदे - लोकसाहित्य मीमांचा भाग -२

२. डॉ प्रभाकर मांडे - लोकसहित्याचे स्वरूप

३. रा.ची ढेरे - लोकसंस्कृती क्षितीजे

◆◆◆